Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**D**

# Paper-III

# JOURNALISM AND MASS COMMUNICATION

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................
   (Name) ................................................
2. (Signature) ........................................
   (Name) ................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..........................................................
(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

**APR - 19317**

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **40** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 75 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गाचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# Journalism and Mass Communication

## Paper III

# पत्रकारिता आणि जनसंचार

## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions. Each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Which is the copyright license through which authors give people the rights to free distribution and use, as well as to build upon the works that they have created ?

   (A) Pirate License

   (B) Creative Commons

   (C) Performing Arts

   (D) Synchronization Rights

1. लेखकाने आपल्या कलाकृतींचे बिनाशुल्क वितरण आणि त्यावर आधारित इतर कलाकृतींच्या निर्मितीचा सामान्य नागरिकांना दिलेल्या स्वामित्वहक्क परवान्याला काय म्हणतात ?

   (A) पायरेट लायसन्स (नक्कल परवाना)

   (B) क्रिएटिव्ह कॉमन्स (सर्जनशील सामायिकता)

   (C) परफॉरमिंग आर्टस् (प्रयोगकला)

   (D) सिंक्रोनायझेशन राईटस् (समक्रमण अधिकार)

2. Which of the following is the basic source of discussion for the theory of 'Sadharanikarn' ?

(A) Yogasutra

(B) Shakuntal

(C) Natyashastra

(D) Bijasutra

3. The term 'embedded journalist' refers to whom ?

(A) Journalists who are associated with same organisation

(B) Journalists who have same designation

(C) Journalists attached to military units in armed conflict

(D) Journalists who are formerly from the army

2. साधारणीकरणाच्या औपपत्तिक (सैद्धान्तिक) चर्चांचा मूळ आधार/स्रोत खालीलपैकी कोणता ?

(A) योगशास्त्र

(B) शाकुंतल

(C) नाट्यशास्त्र

(D) बीजसूत्र

3. 'एम्बेडेड जर्नलिस्ट' असे कोणाला संबोधले जाते ?

(A) जे पत्रकार एकाच संस्थेशी संलग्न असतात

(B) एकाच हुद्द्यावर काम करणारे पत्रकार

(C) सैनिकी कार्यवाहीत जे पत्रकार सैनिकी तुकडीसोबत जोडलेले असतात

(D) जे पत्रकार पूर्वी सेनेत होते

4. In the context of history of cinema in India identify the correct pair from the following :

(A) 1900s — Beginning of full length feature film

(B) 1930s — Beginning of 'Talkie' films

(C) 1950s — Establishment of NFDC

(D) 1980s — Govt. declaration of film entertainment on an industry

5. The intensity of feeling experienced in a society about an issue that appears to threaten social order is called by what name in media studies ?

(A) Hierarchy

(B) Hegemony

(C) Moral panic

(D) Compassion fatigue

4. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासाच्या संदर्भात खालीलपैकी बरोबर जोडी कोणती ?

(A) 1900 चे दशक—पूर्ण लांबीच्या कथात्मक चित्रपटांची सुरुवात

(B) 1930 चे दशक—बोलपटाच्या युगाची सुरुवात

(C) 1950 चे दशक—एन.एफ.डी.सी.ची स्थापना

(D) 1980 चे दशक—चित्रपट, हा एक उद्योग असल्याचे सरकारकडून घोषित

5. सामाजिक व्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्या एखाद्या विषयाबाबतच्या तीव्र भावना समाजात जेव्हा व्यक्त होतात तेव्हा त्याला माध्यम अभ्यासात काय म्हणतात ?

(A) हायरारकी

(B) हेजेमनी

(C) मॉरल पॅनिक

(D) कम्पॅशन फटीग

6. What is Netiquette ?

(A) A term that is used to describe the informal rules of conduct (do's and don'ts) of online behaviour

(B) Research on internet

(C) Banking on internet

(D) The electronic path the Netizen takes while navigating from site to site

7. 'Truth' is generally considered to be a defence to defamation as a civil offence. This is because of which of the following option ?

(A) If the statement in 'true', then it cannot be defamatory

(B) 'Truth' is ethical

(C) What is 'true' is also 'correct'

(D) Truth and defamation are intangible

6. नेटीकेटस् म्हणजे काय ?

(A) ऑनलाईन वर्तनात काय करावे व करू नये याच्या अनौपचारिक नियमांची चर्चा करणारी संज्ञा

(B) इंटरनेट संदर्भातील संशोधन

(C) इंटरनेट द्वारा केले गेलेले बँकिंग व्यवहार

(D) एका वेबसाईटवरून अन्य वेबसाईट पाहताना नेटीझन्सनी (इंटरनेट वापरकर्तेनी) वापरलेला इलेक्ट्रॉनिक मार्ग

7. दिवाणी कायद्यांतर्गत बदनामीच्या खटल्यापासून बचावासाठी 'सत्य' ग्राह्य घरले जाते. हे खालीलपैकी कुठल्या कारणामुळे ?

(A) जर विधान 'सत्य' असेल तर ते बदनामीकारक होऊच शकत नाही

(B) 'सत्य' हे नैतिक असते

(C) जे 'सत्य' आहे तेच 'योग्य' आहे

(D) सत्य आणि बदनामी हे अमूर्त आहेत

8. Which of the following qualifies as PAL telecasting format ?

(A) 25 frames per second, 625 lines per frame

(B) 30 frames per second, 525 lines per frame

(C) 25 frames per second, 525 lines per frame

(D) 30 frames per second, 625 lines per frame

9. In the context of film studies, Soviet Montage refers to :

(A) Continuity

(B) Editing

(C) Dissolve

(D) Narrative

10. Marxist theorists believe that media is responsible for :

(A) Making people overly fearful of the difficulties of life

(B) Helping people to counter the oppression

(C) Helping the 'haves' hide their vast wealth from 'havenots'

(D) Distracting people from social reality in a way that benefits commercial forces

8. पुढीलपैकी कशाची गणना पीएएल टेलिकास्टिंग फॉरमॅटमध्ये होते ?

(A) एका सेकंदात 25 फ्रेमस्, एका फ्रेममध्ये 625 ओळी

(B) एका सेकंदात 30 फ्रेमस्, एका फ्रेममध्ये 525 ओळी

(C) एका सेकंदात 25 फ्रेमस्, एका फ्रेममध्ये 525 ओळी

(D) एका सेकंदात 30 फ्रेमस्, एका फ्रेममध्ये 625 ओळी

9. चित्रपट अभ्यासाच्या संदर्भात, सोवियत मोंताज म्हणजे काय ?

(A) कंटीन्युनिटी

(B) एडिटिंग

(C) डिझॉल्व

(D) नॅराटिव्ह

10. मार्क्सवादी उपपत्ती माध्यमांना कशासाठी जबाबदार मानतात ?

(A) दैनंदिन जीवनातील समस्यांबद्दल लोकांना अधिक घाबरून देणे

(B) शोषणाविरुद्ध झगडण्याबाबत लोकांना मदत करणे

(C) नाही रे गटापासून आपली प्रचंड संपत्ती दडवून ठेवण्यासाठी आहे रे गटास मदत करणे

(D) व्यापारी शक्तीच्या वैयक्तिक स्वार्थाकरिता सामान्य लोकांना सामाजिक वास्तवापासून विचलित करणे

11. Integrating quantitative and qualitative approaches in research is called :

(A) Experimental research

(B) Survey method

(C) Mixed methods

(D) Regression analysis

12. The Hindu, an English daily newspaper has many firsts in India to its credit. Mark the one which is *not* applicable in this context.

(A) First to introduce colour

(B) First to adopt facsimile system of page transmission

(C) First to own fleet of aircraft for distribution

(D) First to launch a business daily

13. Who has developed the operating system 'whats app' ?

(A) Jon Koum and Brian Action

(B) Jon Reth and Jonson

(C) Joseph Berg and Marten

(D) Joseph Relly and Sam Black

11. संशोधनात संख्यात्मक तथा गुणात्मक दृष्टिकोनाच्या एकीकरणाला काय म्हणतात ?

(A) प्रायोगिक संशोधन

(B) सर्वेक्षण पद्धती

(C) मिश्र पद्धती

(D) प्रतिगमन विश्लेषण

12. इंग्रजी दैनिक 'द हिंदू' च्या नावे अनेक अग्रक्रमांचा बहुमान आहे या संदर्भात खालीलपैकी कोणता पर्याय अपवादात्मक आहे ?

(A) रंगाचा प्रथम वापर

(B) पानांच्या प्रसारणासाठी फेसिमल यंत्रणेचा प्रथम वापर

(C) वृत्तपत्राच्या वितरणासाठी विमानताफ्यांचा प्रथम वापर

(D) व्यापारविषयक दैनिक सर्वप्रथम सुरू करणे

13. 'व्हॉटसपची' ऑपरेटिंग सिस्टिम कोणी विकसित केली ?

(A) जॉन कोम अॅण्ड ब्रियन अक्शन

(B) जॉन रिथ आणि जॉन्सन

(C) जोसेफ बर्ग आणि मार्टीन

(D) जोसेफ रेले आणि सॅम ब्लेक

14. Who among the following was *not* associated with the 'Kesari' and 'Mahratha' ?
    - (A) Gopal Krishna Gokhale
    - (B) Vishnushastri Chiplunkar
    - (C) Gopal Ganesh Agarkar
    - (D) Ganesh Garde

15. What is social media analytics ?
    - (A) Analysing the social media activity of a customer
    - (B) Analysing the 'Likes' a person or organisation gets on social media
    - (C) Gathering and analysing the data on social media to support social cause
    - (D) Gathering data from social media and analyzing it to make business decisions

14. खालीलपैकी कोणाचा 'केसरी' आणि 'मराठा' शी संबंध **नव्हता** ?
    - (A) गोपाळ कृष्ण गोखले
    - (B) विष्णुशास्त्री चिपळूणकर
    - (C) गोपाळ गणेश आगरकर
    - (D) गणेश गर्दे

15. समाज माध्यमांचे पृथक्करण म्हणजे काय ?
    - (A) एखाद्या ग्राहकाची सोशल मीडियावरील कार्यवाहीचे विश्लेषण करणे
    - (B) सोशल मीडीयावर एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेला मिळालेल्या 'लाइक्स' चे विश्लेषण करणे
    - (C) सामाजिक कार्याला साहाय्य होईल यासाठी सोशल माध्यमांतील डेटा एकत्रित करणे व त्याचे विश्लेषण करणे
    - (D) व्यापारी निर्णय घेण्यासाठी सोशल मीडिया-वरील माहिती (डेटा) एकत्रित करणे व विश्लेषण करणे

16. In context of research 'intercoder reliability' in content analysis is :
    (A) The degree of agreement between researcher and respondent
    (B) The degree of agreement among independent coders
    (C) The degree of agreement between two categories
    (D) The degree of agreement between two units

16. संशोधनाच्या संदर्भात, आशय विश्लेषणामध्ये इंटरकोडर रीलायबलिटी (आंतरसंकेतक विश्वसनीयता) चा अर्थ पुढीलप्रमाणे होतो :
    (A) संशोधक आणि प्रतिसादक यांमधील संमतीचे प्रमाण
    (B) स्वतंत्र सांकेतांकामधील संमतीचे प्रमाण
    (C) दोन संवर्गामधील संमतीचे प्रमाण
    (D) दोन एककांमधील संमतीचे प्रमाण

17. Which of the following journalists was appointed by Government of India as an interlocutor on Kashmir issue ?
    (A) Arun Shourie
    (B) Yogendra Yadav
    (C) Dilip Cherian
    (D) Dilip Padgaonkar

17. पुढीलपैकी कोणत्या पत्रकाराची भारत सरकारने काश्मीर प्रश्नाच्या सोडवणूकीकरता लोक संवादक म्हणून नेमणूक केली होती ?
    (A) अरूण शौरी
    (B) योगेंद्र यादव
    (C) दिलिप चेरीयन
    (D) दिलिप पाडगावकर

18. The three act structure comprises which of the following ?
    (A) Opening, middle, climax
    (B) Setup, confrontation, resolution
    (C) Opening, confrontation, denouncement
    (D) Setup, climax, anticlimax

19. In the media effect typology suggested by Golding intended long-term effects and unintended long-term effects of media indicate :
    (A) Policy of the medium and ideology respectively
    (B) Ideology and policy of the medium respectively
    (C) Unwitting bias and policy of the medium respectively
    (D) Unwitting bias and bias of the medium respectively

18. तीन अंकी संरचनेत खालीलपैकी कुठले घटक असतात ?
    (A) सुरुवात, मध्य, परिसीमा
    (B) मांडणी, संघर्ष, निराकरण
    (C) सुरुवात, संघर्ष, अखेर
    (D) मांडणी, परिसीमा, वि-परिसीमा

19. गोल्डिंग यांनी सुचविलेल्या माध्यम परिणामांच्या चौकटीत नियोजित दीर्घ मुदतीचे आणि अनियोजित दीर्घ मुदतीचे परिणाम काय निर्देशित करतात ?
    (A) अनुक्रमे माध्यमाचे धोरण आणि विचार-प्रणाली
    (B) अनुक्रमे विचारप्रणाली आणि माध्यमाचे धोरण
    (C) अनुक्रमे अभावित पक्षपात आणि माध्यमांचे धोरण
    (D) अनुक्रमे अभावित पक्षपात आणि माध्यमांचा पक्षपात

20. Identify the *incorrect* pair of media and personality and the media house they are associated with as owner/ proprieter/managing director/ founder or editor.

(A) Vineet Jain — Indian Express

(B) Abhijit Pawar — Sakal

(C) Aveek Sarkar — ABP

(D) Prannoy Roy — NDTV

21. Live telecasts are covered by television channels with the help of :

(A) Mobile TV camera

(B) OB vans

(C) Low power transponder

(D) Remote sensors

22. Which of the following is *not* a film based on the mass media in India ?

(A) It's Breaking News

(B) New Delhi Times

(C) Page 3

(D) 15 Park Avenue

20. माध्यमसमूह व त्याच्याशी मालक/संस्थापक/ व्यवस्थापकीय संचालक वा संपादक म्हणून निगडित असलेली व्यक्ती. याची पुढीलपैकी चूक जोडी कोणती ?

(A) विनित जैन – इंडियन एक्सप्रेस

(B) अभिजित पवार – सकाळ

(C) अवीक सरकार – एबीपी

(D) प्रणोय रॉय – एनडीटीव्ही

21. दूरचित्रवाणी वाहिन्याचे थेट प्रक्षेपण याद्वारे केले जाते ?

(A) मोबाइल टीवी कॅमेरा

(B) ओ. बी. व्हॅन

(C) कमी क्षमतेचा ट्रान्सपोंडर

(D) रिमोट संवेदक

22. खालीलपैकी कुठला भारतीय चित्रपट प्रसार माध्यमांवर आधारलेला **नाही** ?

(A) इट्स ब्रेक्रिंग न्यूज

(B) न्यू डेल्ही टाइम्स

(C) पेज 3

(D) 15 पार्क अॅव्हेन्यू

23. Noelle-Neumann sees the spiral of silence theory as an all-encompassing theory of public opinion that connects the areas of social psychology, mass media and :

(A) Interpersonal Communication

(B) Persuation

(C) Political Science

(D) Sociology

24. The social-cultural anthropologist Arjun Appadurai in his work mentions about five types of cultural flows of imagination. What are they ?

(A) Ecologyscapes, Economic-scapes, Ethnoscapes, Ethnographicscapes, E-Scapes

(B) Ethnoscapes, Econoscapes, Culturescapes, Financescapes and Ideoscapes

(C) Ethnoscapes, Mediascapes, Technoscapes, Financescapes and Ideoscapes

(D) Liberal flow, Realist flow, Post-colonial flow, non-Liberal flow, Structural flow

23. नोएल न्यूमन यांच्या दृष्टीने 'मौनाच्या आवर्तनाची उपपत्ती एक जनमताची सर्वसमावेशक उपपत्ती आहे' या उपपत्तीनुसार सामाजिक मानसशास्त्र, जनमाध्यमे आणि पुढीलपैकी कोणत्या क्षेत्राशी थेट संबंध आहे :

(A) आंतरव्यक्तिक संज्ञापन

(B) मनधरणी

(C) राज्यशास्त्र

(D) समाजशास्त्र

24. समाजसांस्कृतिक मानववंशशास्त्रज्ञ अर्जुन अप्पादुराई यांनी आपल्या लिखाणात कल्पनेच्या सांस्कृतिक प्रवाहाचे पाच प्रकार सांगितले आहेत. हे पाच प्रकार पुढीलपैकी कोणते ?

(A) इकॉलॉजीस्केपस्, इकॉनॉमिकस्केपस्, इथनोस्केपस्, इथ्नोग्राफीकस्केपस्, इ-स्केपस्

(B) इथनोस्केपस्, इकोनोस्केपस्, कल्चरस्केपस्, फायनान्सस्केपस् आणि आयडिओस्केपस्

(C) इथ्नोस्केपस्, मिडीयास्केपस्, टेक्नोस्केपस्, फायनान्सस्केपस् आणि आयडिओस्केपस्

(D) लिबरल फ्लो, रिइलिस्ट फ्लो, पोस्ट-कॉलोनिएल फ्लो, नॉन-लिबरल फ्लो, स्ट्रक्चरल फ्लो

25. Correct expansion of the term 'ASCI' is :
    (A) Advertising Standard Committee of India
    (B) Advertising Standard Council of India
    (C) Association of Systematic Communication and Integration
    (D) Advertising Standard Communications of India

26. In which theory do you find the term 'laggards' ?
    (A) Cultivation Analysis
    (B) Uses and Gratifications Theory
    (C) Diffusion of Innovations Theory
    (D) Spiral of Silence Theory

27. Which of the following is the most correct explanation for the general ineffectiveness of News Broadcasters Association (NBA) as a regulatory body in India ?
    (A) NBA does not have member of judiciary on its panel
    (B) NBA draws its standards mostly from western context
    (C) Being a quasi judicial body it follows complicated procedure
    (D) Many news broadcasters are not members of NBA

25. 'ए.एस.सी.आय.' चा उचित विस्तार कोणता ?
    (A) ॲडव्हरटायझिंग स्टॅन्डर्ड कमिटी ऑफ इंडिया
    (B) ॲडव्हरटायझिंग स्टॅन्डर्ड कौन्सिल ऑफ इंडिया
    (C) असोसिएशन ऑफ सिस्टेमॅटीक कम्युनिकेशन ॲन्ड इंटेग्रेशन
    (D) ॲडव्हरटायझिंग स्टेन्डर्ड कम्युनिकेशन्स ऑफ इंडिया

26. पुढीलपैकी कोणत्या सिद्धांतामध्ये 'लॅगार्ड' या संकल्पनेचा उल्लेख आहे :
    (A) कल्टीव्हेशन ॲनालिसिस (माध्यम संस्कृतीकरण)
    (B) युसेज ॲन्ड ग्रॅटिफिकेशन्स् थेअरी (उपयोग आणि संतोषाचा सिद्धांत)
    (C) डिफ्युजन ऑफ इनोव्हेशन्स थेअरी (नाविन्यतेच्या अभिसरणाचा सिद्धांत)
    (D) स्पायरल ऑफ सायलेंस थेअरी (मौनाच्या आवर्तनाचा सिद्धान्त)

27. भारतातील एक माध्यम नियामक संस्था म्हणून न्यूज ब्रॉडकास्टर्स असोसिएशनच्या (एनबीए) सर्वसाधारण निष्प्रभतेसाठी पुढीलपैकी कोणती बाब सर्वात योग्य कारण ठरते ?
    (A) एनबीएच्या पॅनेलवर न्यायक्षेत्रातील सदस्याचा समावेश नाही
    (B) एनबीए ने त्यांची मानके प्रामुख्याने पाश्चात्य संदर्भातून घेतली आहे
    (C) निम न्यायिक संस्था असल्याने एनबीएची प्रक्रिया किचकट आहे
    (D) अनेक वृत्तवाहिन्या एनबीएच्या सदस्य नाहीत

28. Which of the following describes Charles Bourdieu's concept of cultural capital ?

(A) Ways in which culture is marketed to increase tourism

(B) Mass production of cultural icons

(C) Ways in which culture is marketed to increase the sale of nationally produced goods

(D) The idea that schools are not neutral and that scholastic success requires certain cultural understanding

29. An essay that breaks a work of non-fiction into parts and then explains how the parts work together to create a certain effect—whether to persuade, entertain or inform is called :

(A) Discourse analysis

(B) Ethnographic content analysis

(C) Textual analysis

(D) Rhetorical analysis

28. चार्लस् बोर्दूच्या सांस्कृतिक भांडवल संकल्पनेचे खालीलपैकी कुठल्या वाक्यात योग्य वर्णन होते ?

(A) पर्यटनात वाढ करण्यासाठी संस्कृतीची विक्री करण्याची पद्धत

(B) सांस्कृतिक प्रतिमांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन

(C) राष्ट्रीय पातळीवर उत्पादित वस्तूंची विक्री वाढविण्यासाठी संस्कृतीचे विपणन

(D) शाळा तटस्थ नसतात आणि शैक्षणिक यश मिळविण्यासाठी संस्कृतीची विशिष्ट समज लागते

29. संशोधनपद्धती ज्यामध्ये वास्तविक आशयाची उपघटकांमध्ये विभागणी करून हे उपघटक पाठपुरावा, मनोरंजन अथवा माहिती देणे सारख्या विशिष्ट परिणामांकरिता कसे वापरले जातात! अशा पद्धतीस काय म्हणतात ?

(A) डिसकोर्स ॲनालिसिस (भाषाकेंद्री विश्लेषण)

(B) इथ्नोग्राफिक कंटेट ॲनालिसिस (वांशिक आशय विश्लेषण)

(C) टेक्स्च्युअल ॲनालिसिस (आशयाचे गुणात्मक विश्लेषण)

(D) ऱ्हेटॉरीकल ॲनालिसिस

30. Which of the following media groups in India does *not* have a television channel of its own ?

(A) Living media group

(B) BCCL group

(C) Sakal group

(D) Jagran group

31. Which of the following is *not* a typical characteristic of post-modernism on ideology ?

(A) Pluralism

(B) Self-referentiality

(C) Emphasis on objective reality

(D) Moral relativism

32. In 1955 at the New York museum of modern art as a showcase of Indian culture, which film has been premiered for 22 weeks ?

(A) Satyajit Ray's Pather Panchali

(B) L.V. Prasad's Bhakta Prahalada

(C) V. Shantaram's Ayodhecha Raja

(D) Raj Kapoor's Awara

30. खालीलपैकी कोणत्या भारतीय माध्यम समूहा-कडे स्वत:चे अशी दूरचित्रवाणी वाहिनी **नाही** ?

(A) लिव्हींग मिडिया समूह

(B) बीसीसीएल समूह

(C) सकाळ समूह

(D) जागरण समूह

31. पुढीलपैकी कोणता पर्याय उत्तर आधुनिकतेचे स्वभाव वैशिष्ट्य **नाही** ?

(A) बहुतावाद

(B) स्व-संदर्भता

(C) वस्तुनिष्ठ वास्तवावर भर

(D) नैतिक सापेक्षता

32. पुढीलपैकी कोणता चित्रपट 1955 साली न्यूयॉर्क आधुनिक कला संग्राहलयातील भारतीय संस्कृती दालनात 22 अठवड्यांकरिता प्रदर्शीत करण्यात आला ?

(A) सत्यजीत राय यांचा पथेर पांचाली

(B) एल. व्ही. प्रसाद यांचा भक्त प्रल्हाद

(C) व्ही. शांताराम यांचा अयोद्धेचा राजा

(D) राज कपूर यांचा आवारा

**(Q. Nos. 33 to 35) :**

Read the following passage and answer the 3 questions given under it :

When media gives publicity to a sub-judice matter—before or after the verdict by the court of law—in a way that the accused person almost appear to be guilty or innocent then such publicity by media becomes 'Trial by Media'. It is trial run by the media parallel to the court of law. Such publicity may influence the judicial process and the perceptions of judges and thus in the process infringe upon the accused person's natural right to seek justice in a free and unprejudiced manner. 'Person should be considered an innocent until proven guilty in the court of law' is the basic principle of our judicial process. Media trial works

**(प्रश्न क्र. 33 ते 35) :**

खालील परिच्छेद वाचून पुढील तीन प्रश्नांची उत्तरे द्या :

एखाद्या न्यायप्रविष्ट प्रकरणातील आरोपीला निकालापूर्वी वा निकालानंतर माध्यमे गुन्हेगार किंवा निर्दोष सिद्ध केल्यासारखी प्रसिद्धी देतात तेव्हा ती प्रसिद्धी मिडिया ट्रायल ठरते. एका अर्थाने तो माध्यमांनी चालविलेला समांतर खटला बनतो. अशा प्रसिद्धीमुळे मूळ न्यायालयातील न्यायदान प्रक्रियेवर आणि न्यायाधीशांच्या मतावर कळत नकळत परिणाम होऊन पूर्वग्रहविरहित पद्धतीने न्याय मिळविण्याच्या आरोपीच्या नैसर्गिक हक्कावर गदा येण्याची भीती असते. जोपर्यंत न्यायालयात गुन्हा पूर्णपणे सिद्ध होत नाही तोपर्यंत व्यक्ती निर्दोष मानली गेली पाहिजे हे आपल्याकडील न्यायदानाचे मूलभूत सूत्र. मिडिया ट्रायलमध्ये

exatly in opposite way many a times. Media trial often considers the accused to be guilty until proven innocent in the court. At least, it leads to create such a public-perception. Once a case becomes sub-judice, there is no place for public-opinion, public outrage, mob-mentality etc. But many times media trials are run-under the shadow of the same justiciations. The chances of cases turning into media trial increase particularly when the cases involve a high placed, high-class celebrity person either as an accused or victim. Although this is all well recognised, the issue of 'media trial' is not as simple and unilateral as it appears from above. We have witnessed in the recent past, cases where media has proactively created

अनेकदा याच्या नेमके उलटे होत जाते. जोपर्यंत व्यक्ती निर्दोष सिद्ध होत नाही तोपर्यंत माध्यमांनी चालविलेल्या खटल्यामध्ये तिला गुन्हेगार मानले जाऊ लागते. निदान जनमानसात तरी तशी भावना निर्माण होवू शकते. एखादे प्रकरण न्यायप्रक्रियेच्या परिघात आले की लोकमत, लोकक्षोभ, झुंडगंड अशा कोणत्याही समर्थनाला त्यात स्थान नसते. पण अनेकदा माध्यम खटले अशाच भावनांच्या छायेत चालविले जातात. विशेषत: एखाद्या प्रकरणात उच्चपदस्थ, उच्चवर्गीय, वलयांकित व्यक्ती संशयित वा बळी म्हणून गुंतली असेल तर माध्यमांकडून असे खटले चालविले जाण्याची शक्यता अजूनच वाढते. हे सारे खरे असले तरी मिडिया ट्रायलचा हा मुद्दा वाटतो तितका सोपा वा एकतर्फी नाही. गेल्या काही वर्षांमध्ये एखाद्या न्यायप्रविष्ट प्रकरणात खऱ्या अर्थाने न्याय मिळवून देण्यासाठी माध्यमांनी आग्रहाने जनमत निर्मिती

public opinion in order to seek real justice in some subjudice cases. Technically this can be called as 'Media Trial' but such trials have ultimately helped expose the injustice in the precious trial or helped overcome it. Even courts have taken a note of this different aspect of 'Media Trial' in some of its verdicts.

33. According to the passage 'Media Trial' is :

(A) A case run against a media house in the court of law

(B) A testing and turbulent phase in the media

(C) A case filed by media in the court of law

(D) An opinionated and verdict oriented publicity by media to a subjudice case

केल्याच्या घटनाही घडल्या आहेत त्या तांत्रिक पातळीवर मिडिया ट्रायल असल्या तरी त्यातून अंतिमत: आधिच्या न्यायिक प्रक्रियेत झालेला अन्याय एकतर उघडकीस आला वा दूर होण्यास मदत झाली. न्यायालयाच्या काही निर्णयांमध्येही मिडिया ट्रायलच्या या वेगळ्या बाजूची नोंद घेतली गेल्याचे दिसून येते.

33. वरील परिच्छेदाच्या संदर्भात मिडिया ट्रायल (माध्यम खटला) म्हणजे काय ?

(A) न्यायालयात एखाद्या माध्यम कंपनीविरुद्ध चालविलेला खटला

(B) माध्यमांची परीक्षा बघणारा वा वादळी टप्पा

(C) माध्यमांनी न्यायालयात दाखल केलेला खटला

(D) न्यायप्रविष्ट प्रकरणामध्ये माध्यमांनी दिलेली मतमिश्रीत व निकाल सदृश प्रसिद्धी

34. In the context of the passage which of the following shows the correct option of principles of justice underpinning 'media trial' and 'judicial trial' ?

(A) 'Guilty until proven innocent' and 'innocent until proven guilty' respectively

(B) 'Guilty until proven innocent' in both the cases

(C) 'Innocent until proven guilty' and 'guilty until proven innocent' respectively

(D) 'Innocent until proven guilty' in both the cases

35. In the context of the opinion expressed in the passage which of the following court cases represent an example of a media trial which helped seek real justice by exposing injustice in the previous trial ?

(A) Keshavanand Bharati Case

(B) Jessica Lal Case

(C) Crossroads Case

(D) Sakal *Vs.* Union of India Case

34. वरील परिच्छेदाच्या संदर्भात खालीलपैकी कोणता पर्याय 'माध्यम खटला' व 'न्यायालयीन खटल्या' मागील मूलभूत न्यायिक तत्त्वाचा योग्य पर्याय आहे ?

(A) अनुक्रमे 'निर्दोष सिद्ध होईपर्यंत गुन्हेगार' व 'गुन्हेगार सिद्ध होईपर्यंत निर्दोष'

(B) दोन्ही ठिकाणी 'निर्दोष सिद्ध होईपर्यंत गुन्हेगार'

(C) अनुक्रमे 'गुन्हेगार सिद्ध होईपर्यंत निर्दोष' व 'निर्दोष सिद्ध होईपर्यंत गुन्हेगार'

(D) दोन्ही ठिकाणी 'गुन्हेगार सिद्ध होईपर्यंत निर्दोष'

35. परिच्छेदामध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मताच्या संदर्भात खालीलपैकी कोणता खटला अशा माध्यम खटल्याचेही उदाहरण मानता येईल की ज्यामुळे आधीच्या न्यायिक प्रक्रियेतील अन्याय उघड होऊन खरा न्याय मिळण्यास मदत झाली ?

(A) केशवानंद भारती खटला

(B) जेसिका लाल खटला

(C) क्रॉसरोडस् खटला

(D) सकाळ **विरुद्ध** भारत सरकार खटला

36. In the context of Media Industry, what does oligopoly mean ?

(A) Describes the situation in which a small group of companies exerts almost exclusive control over the business being done

(B) Is a word used to link one subject with another

(C) Monopolisation of editors and politicians

(D) A well known editing technique used by editors

37. What term is used in media studies to describe a research which aims to study the process in which people gradually come to accept the view of the world as portrayed on television as the true representation of reality ?

(A) Motivational analysis

(B) Discourse analysis

(C) Visual analysis

(D) Cultivation analysis

36. माध्यम उद्योगाच्या संदर्भात, ऑलिगोपॉली म्हणजे काय ?

(A) अशी परिस्थिती ज्यामध्ये उद्योगांचा एक छोटा गट संपूर्ण व्यापार जवळजवळ एकस्वपणे नियंत्रित करतो

(B) एका विषयाची दुसऱ्या विषयाशी जोडणी करण्याकरिता वापरली जाणारी संज्ञा

(C) संपादक आणि राजकारण्यांचा एकाधिकार

(D) संपादक वापरत असलेले एक प्रचलित संपादन तंत्र

37. दूरचित्रवाणीवर दिसणारे जग हेच वास्तवातल्या जगाचे यथार्थ चित्रण आहे, असे मानून त्याचा प्रेक्षकांनी हळूहळू स्वीकार करत जाण्याच्या प्रक्रियेचे जे संशोधन होते त्यासाठी माध्यम अभ्यासामध्ये कोणती संज्ञा वापरली जाते ?

(A) प्रेरणाकेंद्री विश्लेषण (मोटीवेशनल अनॅलिसिस)

(B) भाषाकेंद्री विश्लेषण (डिस्कोर्स अनॅलिसिस)

(C) दृश्याचे विश्लेषण (व्हिज्युअल अनॅलिसिस)

(D) मशागतीकरणाचे विश्लेषण (कल्टीवेशन अनॅलिसिस)

38. In which Marathi periodical did Lokhitwadi G. H. Deshmukh publish 'Shatpatre' ?

(A) Darpan

(B) Prabhakar

(C) Kaal

(D) Kesari

39. Which of the following is *not* an important technological trend of network society ?

(A) Convergence of tele, data and communication technologies

(B) Miniaturization of technology

(C) Focus on broadcasting of messages to masses

(D) Embedded and wireless technology

38. लोकहितवादी गोपाळहरी देशमुख यांनी त्यांची शतपत्रे कोणत्या मराठी नियतकालिकात प्रसिद्ध केली ?

(A) दर्पण

(B) प्रभाकर

(C) काळ

(D) केसरी

39. नेटवर्क समाजातील तंत्रज्ञानासंबंधी मुख्य कल वा प्रवाह लक्षात घेतले तर खालीलपैकी कोणता पर्याय योग्य **नाही** ?

(A) दूर, तथ्य आणि संज्ञापन तंत्रज्ञानांचे एकात्मीकरण

(B) तंत्रज्ञानांचे सूक्ष्मीकरण (लघुरूपकरण)

(C) जनांपर्यंत संदेशांचे प्रसारण करण्यावर भर

(D) अवगुंठित व बिनतारी तंत्रज्ञान

40. Which of the following is *not* a correct statement in the context of semiotics ?

(A) Communication is generally a polysemic phenomenon

(B) Communication is primarily social interaction through messages

(C) Meaning is created through cultural interpretation

(D) Meaning is mainly transferred from sender to receiver

41. Which of the following tests of statistical significance is often used with contingency tables, when at least one of the variables concerned is at the nominal level ?

(A) Chi-square ($\chi^2$) test

(B) *t*-test

(C) *f*-test

(D) Beta weight

40. चिह्नशास्त्र (सेमिओटिक्स) संदर्भात खालीलपैकी कोणते विधान योग्य विधान ठरत **नाही** ?

(A) संज्ञापन ही मुख्यत्त्वे बव्हर्थी घटना असते

(B) संज्ञापन म्हणजे मुख्यत्त्वे संदेशांद्वारे होणारी सामाजिक आंतरक्रिया

(C) संस्कृतीसापेक्ष अन्वयार्थाद्वारे अर्थ निर्माण होतो

(D) प्रेषकाकडून ग्राहकाकडे (स्वीकारकाकडे) अर्थ मुख्यत्त्वे हस्तांतरित केला जातो

41. संबंधित चलापैकी एक चल नॉमीनल पातळीवर असते अशावेळी कंटीजेन्सी सारणीचा वापर करत घेतल्या जाणाऱ्या सांख्यिकीय प्रमाणमापन चाचणीला काय म्हणतात ?

(A) काय स्क्वेअर टेस्ट

(B) टी-टेस्ट

(C) एफ-टेस्ट

(D) बीटा वेट

42. In the context of Advertising and media planning, the process of purchasing space in a media is known as :

(A) Media spacing

(B) Media purchasing

(C) Media scheduling

(D) Media buying

43. Who was the media scholar who studied how the media sells disease, famine, war and death and shapes public opinion in her book "Compassion Fatigue : How the media sell disease, famine, war and death" ?

(A) Barbara Cartland

(B) Susan Moellar

(C) Laura Mulvey

(D) Angela McRobbie

42. जाहिरात आणि माध्यमनियोजनाच्या संदर्भात, माध्यमांमध्ये जागा विकत घेण्याच्या क्रियेला काय म्हणतात ?

(A) मिडीया स्पेसिंग

(B) मिडीया परचेसिंग

(C) मिडीया शेड्युलिंग

(D) मिडीया बायिंग

43. माध्यमे रोग, दुष्काळ, युद्ध आणि मृत्यू कसे विकतात आणि सार्वजनिक मत कसे तयार करतात याची ज्या लेखिकेच्या ''कम्पॅशन फटीग : हाऊ दि मीडिया सेल डिसीज, फॅमिन, वॉर अॅन्ड डेथ'' या पुस्तकात मांडणी करण्यात आली आहे त्या लेखिकेचे नाव काय ?

(A) बारबारा कार्टलॅन्ड

(B) सूझन मोलर

(C) लॉरा मुलवे

(D) अँजेला मॅकरॉबी

44. In 1941 Shamshad Begum first sang this song in a film called Himmat which somehow went unnoticed but in 1972, Lata Mangeshkar sang the same song and created history. Identify the song.

(A) Ae Malik tere bande hum

(B) Inhi logon ne le lina dupatta mera

(C) Kata lagaa

(D) Lag ja gale

45. When two versions of a print advertisement are placed in the same issue of a newspaper or magazine, the phenomenon is popularly called as :

(A) Dry run

(B) Split run

(C) Duel run

(D) Double marker

44. 1941 साली शमशाद बेगम यांनी हिम्मत चित्रपटात प्रथम गायलेले परंतु नंतर विस्मरणात गेलेले कोणते गाणे 1972 साली लता मंगेशकर यांनी गायल्यावर सुप्रसिद्ध ठरले ?

(A) ऐ मालिक तेरे बंदे हम

(B) इन्ही लोगों ने ले लिना दुपट्टा मेरा

(C) काटा लगा

(D) लग जा गले

45. ज्यावेळी एका मुद्रित जाहिरातीच्या दोन वेगवेगळ्या आवृत्या मासिकाच्या अथवा वृत्तपत्राच्या एकाच अंकात प्रसिद्ध केल्या जातात, त्या कृतीला काय म्हटले जाते ?

(A) ड्राय रन

(B) स्प्लीट रन

(C) ड्युएल रन

(D) डबल मार्कर

46. In the context of television programming, the sheduling strategy that removes the commercial brake between two successive serials is called :

(A) Blocking

(B) Supersizing

(C) Bridging

(D) Hammocking

47. The term 'subaltern' derived from the work of Antonio Gramsci means :

(A) The underclass, the oppressed in colonial societies

(B) A theoretical movement developed to describe subjectivity

(C) A term which refers to imagined societies or people

(D) The idea that all viewpoints are equal

46. दूरचित्रवाणी कार्यक्रमनिर्मितीच्या संदर्भात, दोन मालिकांमधील व्यावसायिक विश्रांतीचा (जाहिरातींचा) काळ काढून टाकणाऱ्या शेड्युलींग रचनेला काय म्हणतात ?

(A) ब्लाकिंग

(B) सुपरसायझिंग

(C) ब्रिजिंग

(D) हॅमॉकिंग

47. अँटनियो ग्रामसी यांच्या लेखनातून घेतल्या गेलेल्या 'सब्लाटर्न' संकल्पनेचा अर्थ काय ?

(A) वसाहतिक समाजातील शोषीत निम्नवर्ग

(B) व्यक्तिनिष्ठतेचे निर्धारण करण्याकरिता निर्माण झालेली तात्त्विक चळवळ

(C) कल्पित समाज वा लोकं यांकडे निर्देश करणारी संकल्पना

(D) सर्व दृष्टिकोन समान आहेत अशी धारणा

48. Which of the following is the basic criterion of distinction in the concept of 'digital divide' ?
    (A) Ownership of digital distribution infrastructure
    (B) Access to and knowledge of computer and internet
    (C) Ability to create digital content
    (D) Power to regulate the digital media

49. An exaggerated sensational and titillating style of journalism is known as :
    (A) Green Journalism
    (B) White Journalism
    (C) Yellow Journalism
    (D) Crimson Journalism

50. 'Regression Analysis' and 'Path Analysis' are statistical procedures in social research which falls under :
    (A) Tests of significance
    (B) Multivariate technique
    (C) Misuse of tests of significance
    (D) Types of research designs

48. डिजिटल डिव्हाईड या संकल्पनेतील विभाजनाचा मूलाधार असलेला निकष कोणता ?
    (A) डिजिटल वितरणाशी संबंधित पायाभूत सेवांची मालकी
    (B) संगणक आणि इंटरनेट सेवांची उपलब्धता व त्यासंबंधीचे ज्ञान
    (C) डिजिटल स्वरूपाचा आशय निर्माण करण्याची क्षमता
    (D) डिजिटल माध्यमांची नियमन करण्याची अधिकारक्षमता

49. अतिशयोक्तीपूर्ण, सनसनाटी आणि चावटपणाकडे झुकलेली शैली असणाऱ्या पत्रकारितेला खालील नावाने संबोधले जाते :
    (A) हरित पत्रकारिता
    (B) श्वेत पत्रकारिता
    (C) पीत पत्रकारिता
    (D) रक्तवर्णी पत्रकारिता

50. 'प्रतिगमन विश्लेषण' आणि 'मार्ग विश्लेषण' या सामाजिक संशोधनात वापरल्या जाणाऱ्या सांख्यिकी पद्धती याचा भाग आहेत :
    (A) टेस्ट ऑफ सिग्निफिकंस
    (B) मल्टीव्हेरीएट टेक्निक
    (C) टेस्ट ऑफ सिग्निफिकंसचा गैरवापर
    (D) संशोधन आराखड्याचे प्रकार

51. In the context of advertising 'clutter' is defined as :

(A) Coarse paper stock

(B) A promotional tool

(C) An over-abundance of messages

(D) Person incharge of clientale

52. How can public relations be defined ?

(A) A collection of techniques for persuading people to buy products they don't used

(B) A collection of techniques for persuading news organisations to give space or time to people or products that are not inherently newsworthy at all

(C) Planned and continuous communication to provide information about an organisation, issue or product to the public

(D) Planned and continuous communication to observe the inadequacies of an organisation or product

51. जाहिरातीच्या संदर्भात 'क्लटर' म्हणजे काय ?

(A) कोर्स पेपर स्टॉक

(B) एक प्रसिद्धी तंत्र

(C) अतिशय जास्त प्रमाणातील संदेश

(D) ग्राहकवर्गाशी जबाबदार व्यक्ती

52. जनसंपर्काची परिभाषा कशी करता येईल ?

(A) लोकांना एखादे उत्पादन नको असताना विकत घ्यायला उद्युक्त करण्याच्या काही पद्धती

(B) मुळातच काहीही बातमी मूल्य नसलेल्या वस्तू किंवा व्यक्तिसाठी जागा किंवा वेळ उपलब्ध करून द्यायला वृत्त माध्यमांना उद्युक्त करण्याच्या काही पद्धती

(C) सर्वसाधारण लोकांपर्यंत एखादी संस्था, विषय किंवा वस्तुबाबत नियोजित आणि सतत माहिती पुरविण्यासाठीचे संज्ञापन

(D) एखादी संस्था किंवा वस्तूच्या मर्यादांना झाकून टाकण्यासाठी केलेले नियोजित व सततचे संज्ञापन

53. In television programming, flow in how channels and networks try to hold their audience and networks from programme to programme or from one segment of a programme to another. Which media scholar and the word flow for the first time ?

(A) Neil Postman

(B) Raymond Williams

(C) John Fiske

(D) Barbara Cartland

54. In the context of radio audience measurement the term DAR means :

(A) Direct Audience Recall

(B) Daily Audience Rating

(C) Day After Recall

(D) Digital Audio Ratings

53. टेलिव्हिजन प्रोग्रामिंगमधे एका कार्यक्रमातून दुसऱ्यात किंवा कार्यक्रमाच्या एका भागातून दुसऱ्यात जाण्यासाठी टेलिव्हिजन वाहिन्या किंवा नेटवर्क फ्लो (प्रवाह) चा उपयोग करतात. फ्लो हा शब्द कुठल्या माध्यम अभ्यासकाने पहिल्यांदा वापरला ?

(A) नील पोस्टमन

(B) रेमन्ड विल्यम्स

(C) जॉन फिस्के

(D) बारबारा कार्टलॅन्ड

54. नभोवाणी ग्राहक मापनाच्या संदर्भात डी.ए.आर. संकल्पनेचे पूर्णरूप सांगा :

(A) डायरेक्ट ऑडीयन्स रिकॉल

(B) डेली ऑडीयन्स रेटिंग

(C) डे आफ्टर रीकॉल

(D) डिजीटल ऑडीओ रेटिंग्स

55. Which of the following is *not* a guiding principle behind community radio ?

(A) Participation

(B) Elitism

(C) Democracy

(D) Inclusion

56. According to the seminal work by film theorist Madhav Prasad, which of the following is one of the main significant features of production practices of popular or mainstream films in India ?

(A) Story is central idea around which production process revolves

(B) Casting essentially follows the demands and peculiarities of story

(C) Story is not significantly important or central than other production units

(D) Production process follows a strict assembly line starting with story

55. पुढीलपैकी कोणते तत्त्व सामुदायिक नभोवाणी संकल्पनेचे मार्गदर्शक तत्त्व **नाही** ?

(A) सहभागिता (पार्टिसिपेशन)

(B) अभिजनवाद (एलिटीसिझम)

(C) लोकशाही (डेमोक्रेसी)

(D) समावेशकता (इन्क्लुजन)

56. चित्रपट सिद्धान्ती माधव प्रसाद यांच्या मांडणीनुसार मुख्य प्रवाहातील किंवा लोकप्रिय भारतीय चित्रपटांच्या निर्मितीप्रक्रियेचे खालीलपैकी कोणते एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे ?

(A) कथा ही मध्यवर्ती असून सारी निर्मिती-प्रक्रिया तिच्या भोवतीच फिरते

(B) कथेच्या गरजा व बारकाव्यांनुसारच पात्रांसाठी कलाकारांची निवड होते

(C) निर्मितीप्रक्रियेतील इतर घटकांपेक्षा वा एककांपेक्षा कथेचा घटक फार जास्त महत्त्वाचा वा मध्यवर्ती नसतो

(D) कथेपासून सुरुवात करून एका विशिष्ट निर्मितीक्रमानेच सारी निर्मितीप्रक्रिया साकारले

57. Which audit is used to assess a company's image among the organizations publics or to evaluate the effect of a specific program ?

(A) External

(B) Environmental

(C) Social

(D) Public relations

57. एखाद्या विशिष्ट कार्यक्रमाचे परिणाम तथा संस्थेशी संबंधित लोकांच्या मनात असणारी संस्थेची प्रतिमा यांच्या निर्धारणाकरिता कोणते लेखापरीक्षण केले जाते ?

(A) बाह्यात्कारी

(B) पर्यावरण

(C) सामाजिक

(D) जनसंपर्क

58. The deliberate 'silence' for remembrance in broadcasting terminology is known as :

(A) Dead air

(B) Act of God

(C) Drive time

(D) Drops

58. प्रक्षेपणा दरम्यान श्रद्धांजली अर्पण करण्याकरिता सहेतुक पाळल्या गेलेल्या शांततेस प्रक्षेपण परिभाषेत काय म्हणतात ?

(A) डेड एअर

(B) अॅक्ट ऑफ गॉड

(C) ड्राईव्ह टाईम

(D) ड्रॉप्स्

59. Who argued that innovation consists of four stages : invention, diffusion through the social system, time and consequences ?

(A) Paulo Fxire

(B) E. M. Rogers

(C) Wilbur Schramm

(D) Denis McQuail

59. इनोव्हेशन (अभिनवता) चे चार टप्पे पडतात : इंव्हेंशन (शोध), सामाजिक व्यवस्थांमधून झालेले अभिसरण, काळ आणि परिणाम, हा दावा कोणाचा ?

(A) पावलो फ्झायर

(B) इ. एम. रॉजर्स

(C) विल्बुर श्रॅम

(D) डेनिस मॅक्वेल

60. Which of the following concepts linked to Jurgen Habermas is defined as indicating accessible communication spaces that enhance democratic discussion ?

(A) Public sphere

(B) Civil society

(C) Public opinion

(D) Civic engagement

61. Which of the following is *not* the typical feature of web 2.0 media environment ?

(A) Users get converted mostly into pure consumers

(B) Websites work with other systems, products and devices

(C) Higher interactivity and collaboration amongst users

(D) Proliferation of user generated content

60. जुर्गन हबरमास यांच्याशी संलग्न असलेली पुढील कोणती संकल्पना लोकतांत्रिक विचारविमर्शाचे संवर्धन करणाऱ्या सहज उपलब्ध संज्ञापनाच्या अवकाशांकडे निर्देश करते ?

(A) पब्लिक स्फेअर

(B) सिविल सोसायटी

(C) पब्लिक ओपीनियन

(D) सिविक एंगेजमेंट

61. 'वेब 2.0' माध्यम पर्यावरणाचे खालीलपैकी कोणते वैशिष्ट्य मानता येत **नाही** ?

(A) वापरकर्ते माध्यमाचे मुख्यत्वे उपभोक्तेच बनत जातात

(B) वेबसाईटस् इतर व्यवस्था, उत्पादने आणि उपकरणांवरही कार्यरत होत जातात

(C) वापरकर्त्यांमध्ये आंतरक्रिया व सहकृती वाढत जाते

(D) वापरकर्त्यांनी निर्माण केलेल्या आशयाचे प्रमाण वेगाने वाढते

62. The extent to which the results of a study can be generalized across population, setting and time is typically called as :

(A) Internal scalability

(B) External scalability

(C) Internal validity

(D) External validity

63. Who among the following became the acknowledged leader of the untouchables in Poona and started the newspaper 'Somvanshi Mitra' in 1909 ?

(A) Mahatma Phule

(B) Kisan Bansode

(C) Shivaram Kamble

(D) Dr. B. R. Ambedkar

62. एखाद्या संशोधनातील निष्कर्षांचे तथ्यचौकटीत, स्थळ-काळ चौकटीत वा कालचौकटीत किती प्रमाणात सार्वत्रिकीकरण करता येते यावरून त्या संशोधनाचा पुढीलपैकी कोणता गुणधर्म ठरतो ?

(A) अंतर्गत मापनीयता

(B) बहिर्गत मापनीयता

(C) अंतर्गत वैधता

(D) बहिर्गत वैधता

63. 1909 मधे समाजाने ज्यांना पुण्यातील अस्पृश्यांचे नेते म्हणून संबोधले आणि ज्यांनी 'सोमवंशी मित्र' हे वृत्तपत्र चालविले ते कोण ?

(A) महात्मा फुले

(B) किसन बन्सोड

(C) शिवराम काँबळे

(D) डॉ. बाबसाहेब आंबेडकर

64. Which of the following is the most appropriate method under the positivist methodology to study the short-term, immediate effects of violence in film on the behaviour of young viewers ?

(A) Survey

(B) Focus group

(C) Case study

(D) Experiment

65. What relationships does Jean Baudrillard seek to examine through simulacra and simulation ?

(A) A relationship between media and man

(B) A relationship between reality, symbols and society

(C) A relationship between language and society

(D) A relationship between reality and media

64. चित्रपटातील हिंसेचा तरुण प्रेक्षकांच्या वर्तनावर होणारा तातडीचा आणि अल्पमुदतीचा परिणाम अभ्यासण्यासाठी तर्काधारी प्रत्यक्षनिष्ठ पद्धत शास्त्रातील सर्वात उपयुक्त पद्धत कोणती ?

(A) सर्वेक्षण

(B) गटचर्चा

(C) व्यष्टी अध्ययन

(D) प्रयोग

65. त्यांच्या सिम्युलाक्रा आणि सिम्युलेशन या संकल्पांतून जाँ बॉड्रिलार्डने कशातील नात्यांचा मागोवा घेतला ?

(A) माध्यम आणि माणूस यांतील नाते

(B) वास्तव, चिन्हे आणि समाज यांतील नाते

(C) भाषा आणि समाज यांतील नाते

(D) वास्तव आणि माध्यम यांतील नाते

66. The plan that shows time, date and frequency of an advertisement is referred as :

(A) Media plan

(B) Media schedule

(C) Media time

(D) Media space

67. Dr. Bhupen Hazarika, known as the 'Bard of Brahmaputra' was a music director, popular for his folk-songs and ballads in which Indian language ?

(A) Dogri

(B) Oriya

(C) Assamese

(D) Manipuri

66. जाहिरातीच्या वेळा, तारीख आणि वारंवारता दर्शविणाऱ्या योजनेला काय म्हणतात ?

(A) मिडीया प्लॅन

(B) मिडीया शिड्युल

(C) मिडीया टाईम

(D) मिडीया स्पेस

67. 'बार्ड ऑफ ब्रम्हपुत्रा' या टोपणनावाने ओळखले जाणारे संगीतकार डॉ. भुपेन हजारीका त्यांच्या लोकगीत रचनांसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांच्या रचना प्रामुख्याने कोणत्या भारतीय भाषेत आहेत ?

(A) डोग्री

(B) उडीया

(C) आसामी

(D) मनीपुरी

68. The popularity and easy access to which satellite television network is believed, to have resulted in West Asian Arab governments to lose their monopoly on information ?

(A) CNN

(B) Al Jajeera

(C) Al Alam News Network

(D) Fox News

69. Which of the following is *not* a normative functionalist theory of media ?

(A) Authoritatrian theory

(B) Magic multiplier theory

(C) Social responsibility theory

(D) Libertarian theory

68. कुठल्या उपग्रह वाहिनीच्या लोकप्रियता आणि उपलब्धतेमुळे, पश्चिम आशियाच्या अरब सरकारांची माहितीवरील मक्तेदारी संपली असे मानले जाते ?

(A) सी. एन. एन.

(B) अल जझीरा

(C) अल अलम न्यूज नेटवर्क

(D) फॉक्स न्यूज

69. खालीलपैकी कोणती कार्यात्मक नियमनवादी उपपत्ती **नाही** ?

(A) अधिकारवादी उपपत्ती

(B) जादुई गुणक उपपत्ती

(C) सामाजिक जबाबदारी संबंधी उपपत्ती

(D) उदारमतवादी उपपत्ती

70. Which of the following involves an identified sponsor who uses non-personal communication transmitted through the use of paid for media ?

(A) Public Relations

(B) Advertising

(C) Marketing

(D) Paid News

71. What is the term coined by McLuhan in 1964 which suggests that there is, in any society, some bias and blindness induced by its pre-existing technology as well as medium ?

(A) Techno-Determinism

(B) Rear view mirrorism

(C) Techno-shadow

(D) Digital bias

70. खालीलपैकी कशात स्पष्ट ओळख दर्शवलेला प्रायोजक असतो जो माध्यमांना पैसे देऊन व्यक्ती निरपेक्ष संज्ञापन साधतो ?

(A) जनसंपर्क

(B) जाहिरात

(C) विपणन

(D) पेड न्यूज

71. ''कोणत्याही समाजात, कोणत्याही तंत्रज्ञान व माध्यमावर त्याच्या आधीच्या तंत्रज्ञान वा माध्यमाचा पूर्व प्रभावदोष पडतो आणि त्यायोगे त्याच्या वापरावर बंधन येतेच'' ही संकल्पना मॅक्लुहन यांनी 1964 साली मांडली. या संकल्पनेला कोणत्या नावाने संबोधतात ?

(A) टेक्नो-डिटरमिनीझम

(B) रीअर व्ह्यू मिररीझम्

(C) टेक्नो-शॅडो

(D) डिजीटल बायस्

72. Advertising that creates messages in such a way that they pass below the normal limits of perception is called :

(A) Minimalistic advertising

(B) Deceptive advertising

(C) Subliminal advertising

(D) Cognitive advertising

73. In the context of Internet 'net neutrality' refers to :

(A) Enabling access to all content and applications regardless of the source and no favouring/ blocking websites

(B) Enabling access to all content on internet free of cost

(C) Access to confidential sites of govt. under Right to Information Act

(D) Content is filtered made 'neutral' without any biases

72. ज्या जाहिरातींमध्ये जाणीवपूर्वक अशा रीतीने संदेश पेरले जातात की जे सामान्य ग्रहणक्षमतेच्या कक्षेतून निसटून जातात. अशाप्रकारच्या जाहिरातीला काय म्हणतात ?

(A) मिनीमलिस्टिक जाहिरात

(B) डिसेप्टीव्ह जाहिरात

(C) सबलिमीनल जाहिरात

(D) कॉग्नीटिव्ह जाहिरात

73. इंटरनेटच्या संदर्भात नेट-न्यूट्रॅलिटी (नेट-तटस्थता) म्हणजे :

(A) कोणत्याही स्रोतापासून निर्मित आशय तथा ॲप्लिकेशन यांना प्राधान्य किंवा अटकावा-विना दिलेली संमती

(B) इंटरनेटवरील सर्व आशयला मोफत वापरण्याची सुविधा

(C) माहितीच्या अधिकारामुळे संमती नसलेल्या संपर्क सरकारच्या सर्व गोपनीय वेबसाईटच्या आशयाला संपर्क

(D) कोणत्याही पूर्वग्रहाविना आशयांची तटस्थ करणाकरिता केलेली चाळणी

74. The approach to social change that is based on the belief that often the wisdom to solve interactable social problems lies within the community is called :

(A) Cultural Relativism

(B) Positive Deviance

(C) Social Marketing

(D) Magic Bullet

75. In which language Lokmanya Tilak's Maratha Newspaper was published ?

(A) Marathi

(B) English

(C) Marathi and English

(D) Hindi

74. सामान्यपणे, समाजातील गहन सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्याचे शहाणपण त्या समाजसमूहा-मध्येच असते या धारणेवर आधारित सामाजिक बदलांच्या दृष्टिकोनाला कोणत्या संज्ञेने संबोधले जाते ?

(A) सांस्कृतिक सापेक्षतावाद

(B) सकारात्मक अपवर्तन

(C) सामाजिक विपणन

(D) जादूई गोळी

75. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेले मराठा वृत्तपत्र कोणत्या भाषेत होते ?

(A) मराठी

(B) इंग्रजी

(C) मराठी आणि इंग्रजी

(D) हिंदी

## ROUGH WORK